# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**निवडणूक अपिलीय अधिकारी तथा कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेसमोर**

**निवडणूक अपील क्र. १/२०१८**

**निकालपत्र**

**डॉ. अंकुश कदम**

**विरुद्ध**

**निवडणूक निर्णय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

**विषयः-** "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या व मंडळाच्या निवडणुका घेण्याबाबतच्या कार्यपद्धती) एकरूप परिनियम, २०१७" मधील परिनियम १७ नुसार अपील.

असे की, सदर अपील डॉ. अंकुश कदम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा (शिक्षक) निवडणुकीसंदर्भात दि. २९-११-२०१७ रोजी दाखल केले आहे. सदर अपिलात त्यांनी खालील मुद्दे मांडले आहेत.

१) असे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट (अधिसभा) निवडणूक २०१७ ही दि.२४/११/२०१७ रोजी पार पडली असून सदर निवडणुकीची मतमोजणी ही दि. २६/११/२०१७ रोजी घेण्यात आली.

२) असे की, सदर निवडणुकीसाठी मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदर निवडणुकीत विजयी उमेदवारांचे बाबतीत प्राप्त मतांचा ठराविक कोटा ठरवून दिलेला होता व तो ४८४ इतका होता.

३) असे की, सदर निवडणुकीत पसंती क्र. १ ची, कोटा पूर्ततेची मते कोणत्याही उमेदवारास मिळालेली नसल्याने मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियमाप्रमाणे पसंती क्र. २ ची मते मोजण्याचा निर्णय घेतला. परंतु यानंतरही कोणत्याही उमेदवारास ठरवून दिलेल्या कोट्याप्रमाणे (४८४) १ व २ पसंती क्रमांकांच्या मतांची बेरीज केल्यानंतरही प्राप्त झालेली मतांची संख्या ही ठरवून दिलेल्या कोट्याच्या (४८४) मतांच्या संख्येइतकी झालेली नाही.

४) असे, की मा. निवडणूक आयोगाच्या अधिनियम व तरतुदीनुसार जर पसंती क्रमांक १ ची मते ही ठरविलेल्या कोट्याप्रमाणे कोणत्याही उमेदवारास प्राप्त झालेली नसतील तर ठरवून दिलेल्या कमीतकमी मतांची बेरीज ही अनुक्रमे ही पुढील २, ३, ४ व ५ पसंती क्रमापर्यंतची मते मोजणी करून ठरवून दिलेल्या कोट्याप्रमाणे कमीतकमी तेवढी मते या पुढील पाच पसंतीक्रमांपर्यंत मोजणे क्रमप्राप्त असते.

५) असे असतानाही सदर निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेत मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अशी कोणतीच विहित प्रक्रिया न अवलंबता बेकायदेशीरपणे व नियमबाह्यरीत्या सरळसरळ १ व २

पसंती क्रमांकाची मते मोजून ज्या पाच उमेदवारांना इतरांपेक्षा अधिक मते मिळाली त्यांना विजयी घोषित केले आहे. ही बाब कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर, नियमबाह्य व धांदलीने निकाल घोषित करणारी आहे. सबब सदर निकाल हे कोणत्याही परिस्थितीत मान्य करणारा नसून तो मला मान्य नाही. करिता सदर निवडणुकीची फेरमतमोजणी होणे अत्यंत आवश्यक आहे. फेरमतमोजणी झाल्यास मला विजयाची संपूर्ण खात्री आहे.

सदर मुद्दे मांडून त्यांनी अधिसभा (शिक्षक) निवडणुकीचा दि. २६-११-२०१७ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी जाहीर केलेला निकाल रद्द करून सदर मतपत्रिकांची पुनर्मतमोजणी करावी अशी विनंती केली आहे.

असे की, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिट याचिका क्र. २९४८/२०१८ मध्ये मा. न्यायालयाने दि. २०-०३-२०१८ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर अपील दि. २०-०३-२०१८ पासून सहा आठवड्याच्या निकाली काढणे आवश्यक आहे. करिता, त्या अनुषंगाने सदर अपिलाची सुनावणी दि. २७-०३-२०१८, २०-०४-२०१८ व २३-०४-२०१८, २४-०४-२०१८ व २७-०४-२०१८ रोजी नियोजित केली होती. दि. २७-०४-२०१८ रोजी अपिलार्थींचे वकिलांनी त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केला. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तोंडी सुनावणी केली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले.

अपिलार्थी डॉ. कदम यांनी सदर अपिलामध्ये एकूण पाच मुद्दे (वरील नमूद) मांडून त्यांचे अपील मंजूर करण्यास विनंती केली आहे. अपिलार्थींचा लेखी युक्तिवाद वाचला असता सदर युक्तिवादात त्यांनी नवीन मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लेखी युक्तिवादात मांडलेले मुद्दे हे अपिलातील मुद्यांशी विसंगत आहेत. अपिलात अपिलार्थी यांनी दि. २६-११-२०१७ रोजी झालेल्या अधिसभा निवडणूक २०१७ ची झालेली मतमोजणी पुन्हा करण्यात यावी अशी विनंती केली आहे. परंतु आजरोजी दाखल केलेल्या लेखी युक्तिवादात त्यांनी केवळ तिसऱ्या, चौथ्या व त्यानंतरच्या लागोपाठच्या पसंतीक्रमाची मोजणी करण्याची मागणी केली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अपिलातील विनंती व लेखी युक्तिवादातील विनंती ही विसंगत असल्याकारणाने अपिलार्थी यास नेमके काय म्हणावयाचे आहे याबद्दल साशंकता निर्माण होते. याबाबत अपिलार्थींच्या वकिलास लेखी युक्तिवादाशिवाय अतिरिक्त काही सांगावयाचे आहे का असे विचारणा केल्यावरही त्यांनी काहीही सांगावयाचे नाही असे नमूद केले.

डॉ. कदम यांनी पुनर्मतमोजणी करण्याची विनंती त्यांच्या अपिलात केली आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतमोजणी प्रक्रिया अत्यंत अचूक व योग्य पार पडल्याचे नमूद करून तथ्यहीन अपील नामंजूर करून फेटाळण्यास पुनःश्च विनंती केली.

याबाबत अपिलार्थी डॉ. अंकुश कदम यांच्या अपिलाचे पुन्हा बारकाईने वाचन केले. याशिवाय कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अभिलेखावर सादर केलेल्या निवडणूक निकालपत्रकाचे काळजीपूर्वक वाचन केले. सदर सुनावणी दरम्यान एक मुद्दा प्रकर्षाने निदर्शनास आला की, मुळातच एकरूप परिनियमातील तरतुदीनुसार अंतिम फेरी झाल्यानंतर फेरमोजणीची मागणी विचारात घेण्यात येत नाही. शिवाय कुलसचिव यांनी नमूद केल्याप्रमाणे जाहीर केलेल्या निकालपत्रकास सर्व उमेदवारांनी संमती दिल्यानंतरच सदर मतपत्रिका व इतर निवडणूक साहित्य सर्वांसमक्ष सीलबंद करण्यात आले आहे. कुलसचिवांच्या सदर वक्तव्यात मला तथ्य दिसून येते कारण डॉ. कदम यांनी मतमोजणी ही सदोष आहे असे सांगणारे कोणतेही लेखी आक्षेप त्याचवेळी कुलसचिवांना दिले असे अपिलात व अभिलेखावर कुठेही उपलब्ध नाही. याबाबत याचाच अर्थ कुलसचिव यांनी केलेली मतमोजणी व त्याचा निकाल डॉ. कदम यांना



27/04/2018

दि. २६-११-२०१७ रोजी मान्य व कबूल असल्याचे दिसते. याशिवाय वरील नमूद एकरूप परिनियम तरतूद क्र. १७ या अपिलात महत्त्वाचे आहे असे मला वाटते. सदर तरतूद खालीलप्रमाणे आहे.

१७. अपील :—

(१) अंतिम फेरी झाल्यानंतर फेरमोजणीची मागणी विचारात घेण्यात येणार नाही. जर उमेदवार किंवा उमेदवाराचा प्रतिनिधी इच्छुक असेल तर मतमोजणीच्या विशिष्ट फेरी अखेर आक्षेप घेऊ शकेल मात्र जर नंतरच्या फेरीमधील मतमोजणी सुरू झाली असेल तर ते कोणताही आक्षेप घेऊ शकणार नाहीत.

सदर तरतुदीप्रमाणे अंतिम फेरीनंतर फेरमोजणीची मागणी विचारात घेतली जाणार नाही. जर उमेदवार इच्छुक असेल तर मतमोजणीच्या विशिष्ट फेरीअखेर आक्षेप घेऊ शकेल. मात्र नंतरच्या फेरीमधील मोजणी सुरू झाली असेल तर नंतर कोणताही आक्षेप घेऊ शकणार नाही. सदर तरतुदीतील अर्थ स्वयंस्पष्ट असल्याकारणाने डॉ. कदम यांनी पुनर्मतमोजणीची केलेली मागणी मान्य करणे शक्य नाही. शिवाय सदर अपिलात मांडलेले वरील नमूद सर्व मुद्दे तथ्यहीन असल्याचे स्पष्ट होते.

करिता मी प्राध्यापक बी. ए. चोपडे, कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी डॉ. अंकुश कदम यांचे अपील वरील नमूद कारणास्तव फेटाळण्यात येत आहे.
२. सदर निर्णय कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधितांना टपालाद्वारे कळवावा व सदर संचिका निवडणूक अभिलेख कक्षाकडे वर्ग करण्यात यावी.

27/04/2018

**प्राध्यापक बी. ए. चोपडे,**
**कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी**

**दिनांक:- २७-०४-२०१८**